माहितीचा
अधिकार

**महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५मधील कलम १८(१) अन्वये**
**प्राप्त झालेली तक्रार**

**तक्रार क्रमांक: ५२१/२०१९ व ५९/२०२०**

| तक्रारकर्ता | प्रतिवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी | प्रथम अपीलीय अधिकारी |
| श्री. हेमंत देवराव गांजरे, ८७, विठ्ठलनगर २, नागपूर-४४००३४ | शिक्षण विभाग (प्राथमिक) जिल्हा परिषद नागपूर ता. जि. नागपूर | शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद नागपूर ता. जि. नागपूर |

**सुनावणी दिनांक २४.०२.२०२५**

तक्रारकर्ता यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८(१) नुसार व्दितीय अपील क्र. ३७३०/२०१८ संदर्भात दिनांक ०१.०४.२०१९ रोजी पारीत केलेल्या आदेशानुसार कार्यवाही न झाल्यामुळे आयोगाकडे एकुण दोन तक्रार अर्ज दाखल केलेले आहेत. सदर तक्रारीवर दिनांक ३०.०३.२०२२, दिनांक ०८.०८.२०२२ व दिनांक १६.११.२०२२ रोजी सुनावणी घेण्यात आली होती. त्यानंतर आज दिनांक २४.०२.२०२५ रोजी पुनश्च: सुनावणी आयोजित करण्यात आली. आज रोजी सुनावणी दरम्यान तक्रारकर्ता उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी अधिक्षक वर्ग-२, श्री. प्रमोद एन. नाट उपस्थित असून प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

तक्रारकर्ता यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधीलकलम १९ (३) नुसार आयोगात दाखल केलेल्या व्दितीय अपील क्र. ३७३०/२०१८ मध्ये दिनांक ०१.०४.२०१९ रोजी सुनावणी घेवून पुढील प्रमाणे आदेश निर्गमित करण्यात आले आहे.

" अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती अभिलेखात उपलब्ध असल्यास द्यावी. अन्यथा निरंक असे लेखी पत्राद्वारे स्पष्टपणे कळवावे. जन माहिती अधिकारी यांनी माहितीचा अर्ज अर्जदारास परत करणे म्हणजेच नियमांचे उल्लंघन करणे असल्याने माहिती अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ७(१) चा भंग केला असे प्रथम दर्शनी निदर्शनास येत असल्याने त्यांना कलम १९(८)(ग) व २०(१) अन्वये शास्ती का करु नये? याचा खुलासा त्यांनी आयोगास सदर आदेश प्राप्त होताच १५ दिवसात सादर करावा. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांचा आदेश चुकीचा असून माहिती प्रश्नार्थक स्वरुपाची असल्याने नाकारता येईल. दुसरा अर्ज करण्याचा सल्ला देणे बेकायदेशीर आहे. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी सदर आदेश प्राप्त होताच १५ दिवसाच्या आत जन माहिती अधिकारी यांनी कार्यालयात उपलब्ध माहिती आहे, तशा स्वरुपात अर्जदारास १५ दिवसात विनामुल्य द्यावी. नसल्यास निरंक असे लेखी पत्राद्वारे स्पष्टपणे अर्जदारास कळवून त्याची पोहच आयोगास पाठवावी" असे आदेशीत करुन प्रस्तुत द्वितीय अपील अर्ज निकाली काढण्यात आले होते.

उपरोक्त आयोगाच्या आदेशाची अंमलबजावणी न झाल्यामुळे तक्रारकर्ता यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८(१) अंतर्गत (तक्रार क्र. ५२१/२०१९) संदर्भात दिनांक ०१.१०.२०१९ (प्राप्त दिनांक ०१.१०.२०१९) रोजी व (तक्रार क्र. ५९/२०२०) संदर्भात दिनांक १०.०२.२०२० (प्राप्त दिनांक

१०.०२.२०२०) रोजी असे एकुण दोन तक्रार अर्ज आयोगाकडे दाखल केले आहेत. त्यामध्ये " आयोगाचे आदेश पारीत झाले असूनही प्रपत्र-अ नुसार अजूनपर्यंत जाणूनबुजून कोणतीही माहिती मिळालेली नाही. संबंधीत जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अजूनही कार्यालयातच उपलब्ध असलेली माहिती देण्यास टाळाटाळ केलेली आहे. जन माहिती अधिकारी आणि प्रथम अपिलीय अधिकारी हे वारंवार आयोगाच्या आदेशाची अवहेलना करीत असल्यामुळे त्यांचेवर कलम २०(१) नुसार रु. २५,०००/- इतकी शास्ती लावण्यात यावी आणि कलम २०(२) नुसार शिस्तभंगाची कारवाई करण्यात यावी. तसेच मला झालेल्या मानसिक त्रासापोटी रु. १०,००० इतकी नुकसान भरपाई देण्यात यावी " असे नमुद केलेले आहे.

सदर तक्रारीसंदर्भांत सर्व कागदपत्रांचे अवलोकन केल्यानंतर असे निदर्शनास येते की, तक्रारकर्ता यांनी द्वितीय अपील क्र. ३७३०/२०१८ संदर्भात आयोगापुढे एकुण दोन तक्रार अर्ज सादर केलेला आहे. आयोगाचे द्वितीय अपील क्र. ३७३०/२०१८ चे आदेश दिनांक २६.०८.२०१९ रोजी निर्गमित करण्यात आले आहे. त्यानुसार जन माहिती अधिकारी तथा अधिक्षक वर्ग-२ (सा.रा.से.), शिक्षण विभाग (प्राथ.) जिल्हा परिषद नागपूर यांनी दिनांक ०१.१०.२०१९ च्या पत्रान्वये अपिलार्थीस "दिनांक २४.०७.२०१८ च्या माहिती अधिकार अर्जान्वये मागणी केलेली माहिती कार्यालयात उपलब्ध नाही. त्यामुळे मागितलेली माहिती निरंक समजण्यात यावी" असे कळविले. तसेच सदर पत्रावर अपिलार्थी यांनी "केवळ चार पानांची माहिती मिळाली" असे नमुद करुन दिनांक १०.१०.२०१९ रोजी स्वाक्षरीनिशी पोहच दिल्याचे दिसून येते.

उपरोक्त वस्तुस्थितीचे अवलोकन केले असता आयोग या निष्कर्षाला येत आहे की, तक्रारकर्ता यांना आयोगाच्या आदेशाप्रमाणे कार्यालयात उपलब्ध असलेल्या माहितीबाबत कळविलेले आहे. त्यामुळे सदर प्रकरणी आयोगाच्या आदेशाची अंमलबजावणी झाली असल्याने प्रस्तुत तक्रार अर्ज निकाली काढणे क्रमप्राप्त आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

प्रस्तुत तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

(भुपेंद्र गुरव)
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ नागपूर

राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर

**ठिकाण :** नागपूर
**दिनांक:** २४.०२.२०२५

जा.क्र. 1932 दि. 15 APR 2025

E:\तक्रार क्र. 59-2020 व 521-2019-गांजरे.docx